पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे-४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/३०८/२०१५
दिनांक - ०२/ ११/२०१५

प्रति,
मा.श्री./श्रीम. -------------------------------

सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- ४४

**विषय:- अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ४ /११/२०१५ रोजी आयोजित केलेबाबत.. .**

**महोदय/महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबरची मासिक सभा बुधवार दिनांक ४/११ /२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. आपण सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू,
सही
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक ८

दिनांक:- ४/११/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

……………………………………………………………………………………………………..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे नोव्हेंबर २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक ४/११/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक १४/१०/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे ऑक्टोबर २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ७) कायम करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक १ | मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ. सो.६.०० मीटर रुंद रस्त्यास “ हस्तीमल शेठ गादिया मार्ग ” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे<br>(दिनांक ०४/ ११/२०१५ रोजीच्या सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे) |
| विषय क्रमांक २ | मा.संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>प्रभाग क्रमांक १९ मधील बस टर्मीनल (मुकाई चौक) येथे आहे. त्या बस टर्मीनलचे “ मुकाई बस टर्मीनल ” असे नामकरण करणेत यावे.<br>( दिनांक ०४ /११/२०१५ रोजीचे सभेमध्ये घेण्याचे निर्णयाप्रमाणे.) |
| विषय क्रमांक ३ | मा.निलेश शंकरराव पांढरकर यांचा दि. २/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं. १७९ पैकी मध्ये आरक्षण क्रमांक २७३ हे प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या आगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाच्या आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्र. २७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा. शहर सुधारणा समिती मार्फत मा. महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणे. |
| विषय क्रमांक ४ | मा. सभापती यांचे परवानगीने सभा कामकाजात घेणेत येणारे ऐनवेळचे विषय. |

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रिय कार्यालय निगडी, पुणे ४४
जा.क्र.अक्षेका/११/कावि/ ३०८/२०१५
दिनांक :०२ /११/२०१५